PDF Compressor Free Version

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्‌मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

PDF Compressor Free Version

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed refered Research Journal - ISSN No. 2319-6025)]
( विद्यापीठ अनुदान अयोग नवी दिल्ली, मान्यता अ.क्र. ६४१७५ )

## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)

वर्षे नववे : अंक एकवीस - बावीस
जानेवारी - फेब्रुवारी - मार्च - एप्रिल - मे - जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

**संपादक**

डॉ. शिवकुमार सोनाळकर

**अतिथी संपादक**

डॉ. मोहन राजमाने,
प्राचार्य, स.गा.म. कॉलेज, कराड

डॉ. रेश्मा दिवेकर    प्रा. डॉ. रमेश पोळ

**कार्यकारी संपादक**

डॉ. नीला जोशी

**संपादक मंडळ**

डॉ. नंदकुमार मोरे,    डॉ. गोमटेश्वर पाटील,    डॉ. तातोबा बदामे,    डॉ. दिनेश बाघुंबरे

**सल्लागार समिती**

डॉ. राजन गवस,    डॉ. प्रकाश कुंभार,    डॉ. डी. ए. देसाई,    डॉ. अनिल गवळी

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११

**मुद्रक**

श्रीधर मुद्रणालय, कराड
३३८, सोमवार पेठ, कराड ४१५११०
मोबा. ९८९०४९८४९७

**मूल्य : ३००/-**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी श्रीधर मुद्रणालय, कराड येथे छापून अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मताशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

ISSN No. 2319-6025

* महानुभाव तत्त्वज्ञानाची कालसापेक्षता
डॉ. सागर लटके ७०
* महानुभाव संप्रदाय : आचार धर्म
डॉ.सिंधू आवळे ७६
* महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान
डॉ. कोमल कुंदप ७८
* महानुभावीय आचारधर्माची तत्कालीन गरज
प्रा. मोहन चव्हाण ८२
* महानुभाव तत्त्वज्ञान आणि चक्रधर वचनामृत : सौंदर्यात्मक विचार
प्रा.गुंडोपंत पाटील ८५
* महानुभाव साहित्य : मध्ययुगीन मराठीचा मानदंड
डॉ.गवराम पोटे ९०
* महानुभाव संप्रदायाचा आचारधर्म
डॉ. नंदिनी काळे ९३
* चक्रधरांची समता : मनुष्यत्त्वाचा गौरव करणारी
डॉ.प्रशांत गायकवाड ९७
* महानुभाव पंथ व श्री चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान
जयश्री बाबर १०१
* श्री चक्रधर स्वामी यांचा उपदेश आणि राष्ट्रीय एकात्मता
प्रा.प्रेरणा चव्हाण १०४
* चरित्रकार म्हाइंभट्ट व चरित्रकार संत नामदेव : तुलनात्मक अभ्यास
डॉ. सुवर्णा पाटील १०७
* महानुभाव संप्रदायातील महदंबेची भूमिका
डॉ.विनोद राठोड १११
* आद्य मराठी कवयित्री महदंबा: व्यक्ती व साहित्य कृती
डॉ.शकुंतला पिसाळ ११५
* मध्ययुगीन भक्ती साहित्य : भक्ती साहित्यातील महादाईसाचे योगदान
डॉ. सौ. नंदिनी रणखांबे, प्रा. नेताजी सूर्यवंशी ११८
* वारकरी संप्रदायाचे स्वरुप
डॉ. हणमंत पोळ १२१
* भागवत धर्म: एक समाजप्रबोधनपर विचारधारा
डॉ. मानसी लाटकर, १२५
* वारकरी संप्रदाय:स्वरुप आणि तत्त्वज्ञान
जयश्री शिंदे-गायकवाड १३०
* वारकरी संप्रदायाचा जनसामान्यावरील प्रभाव
डॉ.प्रकाश हुलेनवर १३३
* वारकरी संप्रदायाचा आचारधर्म
डॉ. प्राजक्ता निकम १३६

PDF Compressor Free Version

# * अंतरंग *

* मध्ययुगीन मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थिती.
डॉ. अभय पाटील. १

* मध्ययुगीन मराठी संप्रदायातील कवितेची निर्मिती आणि रूपविशेष
डॉ. वामन सरगर २

* मुस्लिम संतांच्या काव्यरचनेतील गुरुमहात्म्य
प्रा. लता ऐवळे ८

* मध्ययुगीन कालखंडातील भक्ती परंपरेचे स्वरूप
डॉ. प्रियांका कुंभार १२

* मध्ययुगीन मराठी साहित्यातील नवविधा भक्ती
अमृता थिटे १६

* मध्ययुगीन संतवाङ्मय प्रवाह आणि स्त्रीसंतांचे स्थान
डॉ.शीतल गोर्डे-पाटील २०

* मध्ययुगीन वाङ्मयातील मराठीचा भाषाभिमान
डॉ. प्रकाश दुकळे २४

* मध्ययुगीन मराठी संप्रदायातील गुप्त बोलीचे स्वरूप
श्री. अनंता कस्तुरे २८

* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील मराठी संतांच्या हिंदी भाषेतील रचना - उद्देश व स्वरुप
डॉ. सुजय पाटील ३२

* महानुभाव संप्रदायातील दुर्लक्षित पैलू
डॉ. भरत जाधव ३६

* महानुभावीय संप्रदाय : एक आढावा
डॉ. बबन गायकवाड, ४०

* "मध्ययुगीन मराठीतील महानुभाव संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान"
सुरेखा व्हसमने ४४

* महानुभावांची मातृसंकल्पना
विश्रांती कांबळे ४८

* महानुभावियांचे तत्त्वज्ञान : जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर
श्री. प्रविणसिंह शिलेदार ५१

* महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म
डॉ. लता मोरे ५४

* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील महानुभाव संप्रदाय
प्रा. संभाजी कदम ५८

* 'महानुभाव पंथ साहित्य सरिता'
सौ.शुभांगी कुंभार ६२

* 'महानुभाव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यातील साम्यभेद'
प्रा.सौ.शैला माने ६६

PDF Compressor Free Version

# * अंतरंग *

* मध्ययुगीन मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थिती.
डॉ. अभय पाटील. १

* मध्ययुगीन मराठी संप्रदायातील कवितेची निर्मिती आणि रूपविशेष
डॉ. वामन सरगर २

* मुस्लिम संतांच्या काव्यरचनेतील गुरुमहात्म्य
प्रा. लता ऐवळे ८

* मध्ययुगीन कालखंडातील भक्ती परंपरेचे स्वरूप
डॉ. प्रियांका कुंभार १२

* मध्ययुगीन मराठी साहित्यातील नवविधा भक्ती
अमृता थिटे १६

* मध्ययुगीन संतवाङ्मय प्रवाह आणि स्त्रीसंतांचे स्थान
डॉ.शीतल गोर्डे-पाटील २०

* मध्ययुगीन वाङ्मयातील मराठीचा भाषाभिमान
डॉ. प्रकाश दुकळे २४

* मध्ययुगीन मराठी संप्रदायातील गुप्त बोलीचे स्वरूप
श्री. अनंता कस्तुरे २८

* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील मराठी संतांच्या हिंदी भाषेतील रचना - उद्देश व स्वरुप
डॉ. सुजय पाटील ३२

* महानुभाव संप्रदायातील दुर्लक्षित पैलू
डॉ. भरत जाधव ३६

* महानुभावीय संप्रदाय : एक आढावा
डॉ. बबन गायकवाड, ४०

* ''मध्ययुगीन मराठीतील महानुभाव संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान''
सुरेखा व्हसमने ४४

* महानुभावांची मातृसंकल्पना
विश्रांती कांबळे ४८

* महानुभावियांचे तत्त्वज्ञान : जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर
श्री. प्रविणसिंह शिलेदार ५१

* महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म
डॉ. लता मोरे ५४

* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील महानुभाव संप्रदाय
प्रा. संभाजी कदम ५८

* 'महानुभाव पंथ साहित्य सरिता'
सौ.शुभांगी कुंभार ६२

* 'महानुभाव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यातील साम्यभेद'
प्रा.सौ.शैला माने ६६

PDF Compressor Free Version

# वारकरी संप्रदायाचे स्वरुप

**प्रा. डॉ. हणमंत पोळ**
रा. श्री. भ. महाविद्यालय, औंध,

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा उदय भागवत भक्त पुंडलिकापासून झाला. पुंडलिकाची माता-पिता भक्ती पाहून अठ्ठावीस युगापासून पंढरपूरचा विठ्ठल म्हणजेच श्रीकृष्ण तोच भगवंत, कर कटावर ठेवून भक्तासाठी उभा आहे. पुंडलिकाचा भक्तामाजी अग्रणी असा उल्लेख संत जनाबाई मोठ्या अभिमानाने करते. संत ज्ञानेश्वरांनी निवृत्तीनाथांना पुंडलिकाविषयी विचारले असता, ते म्हणतात,

"तत्त्वे तत्व धरी कोहं भाव हे करि । सोहं सोहं करी कोण सये ।।१।।
सोकरी पुंडलिक ज्ञान पुण्यश्लोक । विठ्ठली त्रैलोक उध्दारिले ।।२।।

भक्त पुंडलिकाच्या भक्तीने श्री विठ्ठल म्हणजेच श्रीकृष्ण पंढरपूरला आले. अशी कथा वारकरी संप्रदायात आदराने सांगितली जाते. वाराणसीला जाताना कुक्कुट स्वामींची भेट होते. पृथ्वीवरील सर्व तीर्थे आई - वडीलांच्या रुपाने माझ्या घरी आहेत. मी त्यांची सेवा शिव - पार्वतीच्या रुपात करतो हिच माझी ईश्वर सेवा. असे ते सांगतात. या भेटीचा परिणाम होऊन तो लोहदंडक्षेत्री आजच्या पंढरपूर येथे माता पित्याची सेवा अहोरात्र करतो. साक्षात ईश्वर त्याच्या भेटीला आले असताना भक्तीत खंड पडू नये म्हणून ईश्वराला उभा राहण्यासाठी वीट देतो वीटेवर उभा राहून ईश्वर त्याची भक्ती पहात आहे. विटेवर उभा राहिला म्हणून त्याला विठ्ठल म्हणतात असेही वारकरी संप्रदायात सांगितले जाते. भक्त पुंडलिकाची कथा पदस्कंध पुराणात आहे.

**वारकरी संप्रदायाचचे तत्त्वज्ञान**

कोणत्याही संप्रदायामागे विचार प्रणालीचे बळ असते. ज्ञानेश्वरांनी भागवत धर्मातील तत्त्वांना भक्तिमार्गाची जोड देवून वारकरी संप्रदायिक तात्तिवक विचार व्यक्त केले. या विचारांचा पुरस्कार या संप्रदायातील संतांनी केला.

**परमात्मा**

'परमात्मा' कोणत्याही प्रमाणांनी सिद्ध करण्याची वस्तु नाही. आत्म्याचा व्यवहार हा चैतन्य स्वरुप आत्मसत्तेखेरीज होत नाही. आत्मा आहे म्हणून नेत्रादी इंद्रिये पाहू शकतात. 'देह' अनित्य असून 'आत्मा' हा नित्य आहे. आत्मा देहातील देहराज होय. वारकरी संप्रदायातील ग्रंथात आत्मा हाच परमात्मा हे तत्त्व झाल्याचे दिसून येते.

**देव -देवी / शिवशक्तीस**

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत देवदेवी, शिवशक्ती तत्त्वावर प्रकृति-पुरुष तत्त्व विचारसांगितलेला आहे. वेदांताचे निरुपण केले आहे. प्रकृति-पुरुषांतील द्वैताचा निरास ब्रह्मात करून अद्वैत तत्त्वदर्शन घडविले आहे. वेदांतात ब्रह्माचा संकल्परूप मायेतून प्रकृति- पुरुषाचा जन्म झाला. प्रकृति-पुरुष अनादि स्वतः सिद्ध आहेत ती कोणतीही कार्ये करीत नाहीत हा सांख्य सिद्धांत आहे.

PDF Compressor Free Version

**जगत**

जगत म्हणजे ज्ञानस्वरुप परमात्म्याची स्फूर्ती होय. विश्व ही चैतन्याची क्रीडा होय. ज्ञानेश्वरांचे स्फूर्तिवाद तत्त्वात जगत विचार आहे. विश्व, जीव, जगत, सृष्टी, संसार इत्यादी सर्व परब्रह्म स्वरुपातच आहेत. सोने व अलंकार, साखर व गोडी, तंतु आणि पट, माती आणि घट जसे एकरूप असतात त्याप्रमाणे परमेश्वर आणि जगत एक होय.

**जीव**

वारकरी संप्रदायात जीवतत्त्व विचार आहे. जीवतत्त्व विचारात पंच महाभूते साकार केल्यानंतर त्या साकार शरीरात शिरुन ईश्वरच प्रकृतीच्या योगाने जीवाच्या रुपाने त्या शरीराचा चालक झाला. जीव व शिव दोन्ही तोच झाला. त्याला पुरुष किंवा शिव म्हणतात. शरीराचा चालक तो जीव होय.

**ईश्वर**

वारकरी सांप्रदायिक तत्त्वज्ञानात ब्रह्म आणि ईश्वर यांच्यात वस्तुतः भेद नाही. विश्वाच्या निमित्त मात्र सापेक्षतेने ब्रह्माचे वर्णन म्हणजे ईश्वर होय. ''ब्रह्म आणि ईश्वर यांच्यात वस्तुतः काहीच भेद नाही. विश्वाच्या निमित्तमात्र सापेक्षतेने ब्रह्माचे वर्णन म्हणजे ईश्वर होय.''

**माया**

वारकरी सांप्रदायिक तत्त्वज्ञानामध्ये 'माया' विचार आहे. संत ज्ञानेश्वरांना 'माया' शब्दाचा वेगळा अर्थ अभिप्रेत आहे. 'माया' ही परमेश्वराची चमत्कृतिजन्य शक्ती आहे. 'माया' ही मोहिनी आहे. त्यामुळेच माणूस मोहापायी अशुभ कार्य करीत असतो.

**वारकरी संप्रदायाचा अचारधर्म**

वारकरी सांप्रदायिक अनुयायांची स्वतंत्र आचारप्रणाली आहे. तिला धार्मिक, सांस्कृतिक, सांप्रदायिक महत्त्वाचे स्थान आहे.

**१) दैवत – श्री विठ्ठल**

वारकरी सांप्रदायिकांची पंढरपूरची श्री विठ्ठलाची मूर्ती उपास्य दैवत आहे. पंढरपूरचा विठ्ठल, पांडुरंग हा सगुण निर्गुण स्वरुपात आहे. वारकरी सांप्रदायात परमेश्वराची अवतार संकल्पना स्वीकारलेली आहे.

**२) ग्रंथप्रामाण्य**

वारकरी सांप्रदायात भगवद् गीता आणि भागवत हे प्रमाणभूत ग्रंथ आहेत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामांची गाथा, इतर संतांचे अभंग भक्तिभावाने वाचले जातात. या सांप्रदायात अद्वैतभक्ती केली जाते. सामान्यांसाठी साधा सुलभ भक्तिमार्ग हा साधनेसाठी सांगितला आहे. त्यामुळेच हा संप्रदाय वाढला व आजही अनुयायी वाढत आहेत.

'रामकृष्णहरी' या षडाक्षरी मंत्राचा नामोच्चार करुन भक्ती करतात. गरुड, हनुंत, पुंडलिक हे भक्तराज श्रध्दास्थानी मानले जातात. गळ्यात तुळशीमाळा घातल्या जातात तर कपाळी उभा अष्टगंध लावला जातो. वारकरी एकादशीचे व्रत करतात. या संप्रदायात 'देव ते संत, संत ते देव' हा सिध्दांत मानला जातो. संत हेच परमेश्वराचे अवतार मानले जातात. पंढरपूर, आळंदी, देहू, सासवड, पैठण, त्र्यंबकेश्वर या तिर्थांना या

ISSN No. 2319-6025

...यातले लोक भेटी देतात. परस्त्री, परधन, परनिंदा, मद्यमांस या सांप्रदायात वर्ज्य ...ले जाते. या संप्रदायात परोपकाराचे व्रत स्वीकारलेले आहे. स्वार्थविरहित जीवन ...वे. सर्व प्राणीमात्राचे ठिकाणी समत्त्व बुध्दीने, परमेश्वराचेच अस्तित्त्व जाणावे. ...काचा मनाने सगळ्यांच्या उपयोगी पडावे असा हा संप्रदाय सांगतो. शुध्द आचरणावर ... संप्रदायाची भर आहे.

**...व्यप्रकार**

...करी संप्रदायातील संतांनी विविध काव्यप्रकार परमेश्वर भक्तिसाठी वापरले आहेत.

**...भंग**

... मराठी माणसाच्या अंत:करणात रुजलेला काव्यप्रकार आहे. अभंग हा एक छंद ...हे. ज्या छंदात भंग होत नाही तो अभंग होय. भंग म्हणजे कर्णधुर गण. हे गण ज्या ...येत नाहीत तो अभंग. संतांची अभंगवाणी आपल्या दैवताच्या भक्तिभावातून निर्माण ...ली आहे. या अभंगामध्ये आर्तता, विनम्रता, करुणा, प्रांजळपणा, कळवळा, सात्त्विकता ... गुण आढळून येतात.

**ओवी**

ओवी हा मराठीतील मुख्य छंद आहे. ओवी ही गेय असते. ओवीतून भावकविता साकारल्याचे दिसून येते. लोककाव्यात ओवीचा गेय काव्यप्रकार म्हणून वापरलेला आहे. ओवीतून भावकविता साकारलेली आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ओवीतच लिहिली. मुकुंदराज, ...कनाथ, रामदास वगैरे संतांनीही ओवीचा वापर केला.

**आरती**

आरती हा पद्य काव्यप्रकार आहे. या काव्यप्रकाराची रचना मात्रावर्तनी असते. नामदेवांनी आरती हा काव्यप्रकार वापरला आहे.

**गौळण**

गौळणींची रचना मुख्यत्वे करुन श्रीकृष्ण भक्तिवर आहे. राधाकृष्णाच्या प्रेमाला संतांनी गौळणीच्या रुपाने व्यक्त केले आहे. गौळणीमध्ये मुग्धशृंगाराचे वर्णन असते. लौकिक प्रेमभावनेचा मधुर अविष्कार गौळणीच्या माध्यमातून केला जातो. एकनाथांच्या गौळणी प्रसिध्द आहेत. नामदेव, ज्ञानेश्वर यांनीही गौळणींची रचना केली आहे.

**विरहिणी (विराणी)**

वारकरी सांप्रदायिक संतांनी विठ्ठलाशी सर्व प्रकारचे नाती जोडली आहेत. पिता, माता, बंधु, सखी, सखा, त्राता अशा विविध रुपात ते परमेश्वराला पाहतात. विठ्ठलाचा दुरावा त्यांना सहन होत नाही. आपल्या अंत:करणातील दु:खे विठ्ठलाजवळ व्यक्त करतात. त्यांची भावावस्था कथन करणारी भावना विरहिणीमधून व्यक्त होते. हा आत्मनिवेदनपर भक्तीचा प्रकार आहे.

**भारुड**

भारुड म्हटले की एकनाथांचे नाव घेतले जाते. एकनाथांच्या पूर्वीही भारुड हा काव्यप्रकार अस्तित्वात होता. एकनाथांच्या भारुडामुळे या काव्यप्रकरास प्रसिध्दी मिळाली. समाज जागृतीसाठी लोकनाट्य, लोककाव्य म्हणून भारुड काव्यप्रकाराचा सामान्य माणसाच्या


ISSN No. 2319-6025

मनावर पगडा बसलेला आहे.

**संदर्भ**

१. बी.एन. पाटील – प्राचीन महाराष्ट्र साहित्य वैभव, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २००९.
२. साखरे महाराज – ज्ञानेश्वरी, सरस्वती, बुक डिस्ट्रिब्युटर्स, पुणे – २
३. देशपांडे अ.ना. – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हीनस प्रकाशन, पुणे – ३०
४. शेणोलीकर ह.श्री. – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर
५. नासिराबादकर ल.रा. – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

* * * * * *

19-20

रयत शिक्षण संस्थेचे,

## सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)

Accredited 'A+' with CGPA 3.63 by NAAC
ISO 9001 : 2015 Certified College

Website : www.sgm.edu.in E-mail : sgmkarad@yahoo.com

**पदवी व पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र, मराठी विभाग**

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा)

आणि

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

आयोजित

**राष्ट्रीय चर्चासत्र व नववे वार्षिक अधिवेशन**

चर्चासत्राचा विषय

# प्रमाणपत्र

श्री. / श्रीमती डॉ. हणमंत पोळ
राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध
यांनी शनिवार दि. ०१ ते रविवार ०२ फेब्रुवारी, २०२० या कालावधीत सद्गुरू गाडगे म कॉलेज, कराड, ता. कराड, जि. सातारा येथे पदवी व पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र मराठी विभाग, उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्यावतीने आ केलेल्या **मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय** या विषयावरील द्विदिवसीय राष्ट्रीय च व नवव्या अधिवेशनात अध्यक्ष /उद्घाटक /साधनव्यक्ती / निबंधवाचक / सत्राध्यक्ष / सत्रसंयोजक / प्र म्हणून उपस्थित राहून सक्रीय सहभाग दिल्याप्रीत्यर्थ हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

सादर केलेल्या शोध निबंधाचे शीर्षक : 'वारकरी संप्रदाय स्वरूप'

डॉ. रेश्मा दिवेकर | प्रा. डॉ. रमेश पोळ | डॉ. प्रकाश दुकळे | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | डॉ. मोहन